बैंक ऑफ महाराष्ट्र
Bank of Maharashtra
भारत सरकार का उद्यम
एक परिवार एक बैंक

आज़ादी का अमृत महोत्सव

निगमित संप्रेषण एवं निवेशक संबंध
प्रधान कार्यालय : लोकमंगल, शिवाजीनगर, पुणे - 5
टला : 020-25614495, 25614366, 25514501 से 12 विस्तार. 215

# वृत्तपत्रीय निवेदन

## बँक ऑफ महाराष्ट्रची १९वी वार्षिक सर्वसाधारण सभा संपन्न

**दिनांक २८ जून २०२२** : देशाच्या सार्वजनिक बँकिंग क्षेत्रातील अग्रगण्य बँक असलेल्या बँक ऑफ महाराष्ट्रची १९वी वार्षिक सर्वसाधारण सभा दिनांक २८ जून २०२२ रोजी दृकश्राव्य माध्यमातून पार पडली. सदर सभेमध्ये दिनांक ३१ मार्च २०२२ रोजी समाप्त झालेल्या वित्तीय वर्षाच्या ताळेबंद व नफा तोटा पत्रकास मान्यता देण्यात आली. दिनांक ३१ मार्च २०२२ रोजीचा ताळेबंद स्वीकारताना भागधारकांनी लाभांश घोषित करण्याच्या व भांडवल उभारणी करण्याच्या ठरावास मान्यता दिली. भागधारकांनी बँक व बँकेच्या नेतृत्वावर विश्वास व्यक्त केला.

बँक ऑफ महाराष्ट्रचे कार्यकारी संचालक श्री ए बी विजयकुमार यांनी बँकेच्या भागधारकांना संबोधित करताना वित्तीय वर्ष २०२१-२२ मधील बँकेची दैदिप्यमान कामगिरी अधोरेखित केली व बँकेने केलेल्या विविध उपाययोजनांची माहिती दिली. बँकेची कामगिरी सुधारण्यासाठी व्यवस्थापनाने केलेल्या परिश्रमांचे भागधारकांनी कौतुक केले व त्यास पोहोचपावती दिली.

बँकेचे कार्यकारी संचालक श्री आशिष पांडे, संचालक मंडळाचे सदस्य सर्वश्री एम के वर्मा, श्री राकेश कुमार, श्री शशांक श्रीवास्तव, व श्री सरदार बलजित सिंह तसेच बँकेचे मुख्य वित्तीय अधिकारी, सरव्यवस्थापक, भारत सरकारचे प्रतिनिधी व लेखापरीक्षक सुद्धा सभेमध्ये उपस्थित होते.




**छायाचित्रात** (डावीकडून उजवीकडे): बँक ऑफ महाराष्ट्रचे कार्यकारी संचालक श्री आशिष पांडे व श्री ए बी विजयकुमार हे बँक ऑफ महाराष्ट्रच्या १९ व्या सर्वसाधारण वार्षिक सभेस दृकश्राव्य माध्यामातून संबोधित करताना दिसत आहेत.